मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# वायू प्रदूषण नियंत्रण पथकाने केलेल्या कारवाईत एकाच दिवसात २ लाख १७ हजारांचा दंड वसूल!

## हॉटेल आणि बेकरी व्यवसायांकडून १० हजार रूपये दंड वसूल

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** बुधवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी वायू प्रदूषण नियंत्रण पथकाने केलेल्या कारवाईत एकाच दिवसात २ लाख १७ हजार ७५३ इतका दंड वसूल करण्यात आला. अ प्रभागातील वायू प्रदूषण नियंत्रण पथकाच्यावतीने हॉटेल आणि बेकरी व्यवसायांकडून १० हजार रूपये तर इतर ठिकाणी केलेल्या कारवाईत ८ हजार ५९३ रुपये असा एकूण मिळून १८ हजार ५९३



रुपये दंड वसूल करण्यात आला. ब प्रभागामार्फत ४१ हजार १६० रुपये दंड वसुल करण्यात आला असून ७ ठिकाणी वायू प्रदूषण नियंत्रण पथकाच्या वतीने केलेल्या पाहणीत २ ठिकाणी वायू प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने जारी केलेल्या निर्देशांचे पालन न केल्याने नोटीस बजावण्यात आली आहे. क प्रभागाच्या पथकाच्या वतीने १० ठिकाणांना भेट देण्यात आली त्यातील ३ ठिकाणी निर्देशांचे पालन न केल्याप्रकरणी नोटीस बजावण्यात आली असून एकूण १५ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. इ प्रभागाच्या वायू प्रदूषण नियंत्रण पथकाच्या वतीने एकूण १० हजार दंड वसूल करण्यात आला. पथकाने ३ ठिकाणांना नोटीस बजावली असून २ जणांवर दंडात्मक कारवाई केली आहे. फ प्रभागामार्फत एकूण ३५ ठिकाणांची पाहणी करण्यात आली. निर्देशांचे पालन न केल्याप्रकरणी ९ जणांवर कारवाई करण्यात आली असून एकूण १ लाख २५ हजार रुपये दंड वसुली करण्यात आली आहे. ग प्रभागाच्या वतीने काल एकूण ३ हजार रुपये दंड वसुल करण्यात आला आणि १५ ठिकाणी पाहणी करण्यात आली. त्यातील ६ ठिकाणी निर्देशांचे पालन न केल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे. ह प्रभाग वायू प्रदूषण नियंत्रण पथकाच्या वतीने एकूण ५ हजार रुपये दंड वसुली करण्यात आली. पथकाने ४ ठिकाणी पाहणी केली आणि एका ठिकाणी निर्देशांचे पालन न केल्याप्रकरणी नोटीस बजावली आहे.

# मतदान नोंदणी करायची? तर मोहिमेत सहभागी व्हा!

## मतदार नोंदणी अधिकारी तथा सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांचे आवाहन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जास्तीत-जास्त मतदार नोंदणी करण्यासाठी चिंचवड विधानसभा मतदारसंघात विशेष प्रयत्न केले जात आहेत. याच अनुषंगाने दि.२५ आणि दि.२६ नोव्हेंबर रोजी दोन दिवस मतदार नोंदणीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत जास्तीत जास्त तरुण-तरुणी आणि ज्यांचे नाव नोंदणी करणे बाकी आहे, अशांनी सहभागी व्हावे, असे आवाहन



२०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे मतदार नोंदणी अधिकारी तथा कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे. भारत निवडणूक आयोगामार्फत दि.१ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम घोषित केला आहे. या कार्यक्रमांतर्गत मतदानापासून वंचित राहिलेल्या नागरिकांना मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आली आहे. दि. २५ आणि दि. २६ नोव्हेंबर चिंचवड विधानसभेतील प्रत्येक मतदान केंद्रावर सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत 'डशिलळरश्र उराी षेॲ तींशऔ ठशसळीींॲरींळेप' आयोजित केला आहे. (फॉर्म नं ६ अ) परदेशी मतदार म्हणून नोंदणीसाठी (फॉर्म नं ६ इ) विद्यमान मतदारांव्दारे आधार क्रमांकाची माहिती (फॉर्म नं ७ ) आक्षेप आणि स्वतः हटवणे (फॉर्म नं ८ ) दुरुस्ती, स्थलांतर, डूप्लिकेट एझखउ तसेच दिव्यांग व्यक्ती म्हणून चिन्हांकित करण्यासाठी हा अर्ज करावा. चिंचवड विधानसभा मतदार संघातील ज्या मतदार यादीत नाव नोंदविलेल्या मतदारांचे लिंग

> **“ निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार चिं-चवड विधानसभा मतदारसंघात मतदार नोंदणीसाठी दोन दिवस विशेष मोहीम आयोजित केली आहे. या मोहिमेत जास्तीत-जास्त पात्र नागरिकांनी २०५ चिंचवड विधानसभा मतदार संघ कार्यालय, यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालय, थेरगाव, चिंचवड विधानसभा मतदार संघातील सर्व मतदान केंद्र येथे अर्ज जमा करावेत.**
>
> **– नीलेश देशमुख,**
> **२०५ चिंचवड विधानसभा मतदार नोंदणी अधिकारी**

गुणोत्तर ९१० पेक्षा कमी आहे, त्या विविध विभागात मतदार नोंदणीचे प्रमाण वाढविण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे. यासाठी वॉर्ड स्तरावर महिला, तृतीय पंथीय, बांधकाम व्यवसायातील मजूर, सर्व सहकारी सोसायट्या, औद्योगिक आस्थापनेवरील कर्मचारी वर्ग, दिव्यांग, बेघर व्यक्ती आदींसाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे.

# मावळातील विकास कामांचा दर्जा राखा, अधिकाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करा;

## शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांची सूचना

**पिंपरी । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मावळमध्ये विविध विकास कामे सुरू आहेत. या कामांना गती द्यावी. दर्जेदार, टिकाऊ स्वरूपाची कामे करावीत. कामाच्या दर्जात कोणत्याही प्रकारची तडजोड खपवून घेतली जाणार नाही. दर्जाहीन कामे झाल्यास चौकशी केली जाईल असा इशारा मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे दिला. तसेच मावळातील विविध कार्यालयातील अधिकारी वेळेवर जागेवर हजर नसतात. त्यामुळे अधिकाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.




मावळ तालुक्यातील विविध विभागाची तालुकास्तरीय आढावा बैठक शुक्रवारी खासदार बारणे यांनी घेतली. वडगाव येथील पंचायत समितीच्या कार्यालयात झालेल्या बैठकीस तहसीलदार विक्रम देशमुख, गट विकास अधिकारी सुधीर भागवत, तळेगांव दाभाडे नगरपरिदेचे मुख्याधिकारी एन.के. पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे धनराज दराडे, कृषी अधिकारी दत्तात्रय पडवळ,विद्युत विभागाचे शिवाजी चव्हाण, गट विकास शिक्षण अधिकारी एस. आर. वाळूंज, शिवसेना तालुका प्रमुख राजु खांडभोर, उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे , आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, साहेबराव कारके,सुनिल ढोरे,अंकुश देशमुख,विशाल हुलावळे उपस्थित होते. मावळातील ११४ गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणी पुरवठाची कामे सुरू आहेत. त्यासाठी मोठा निधी मिळाला आहे. २७ गावातील कामे पूर्ण झाली आहेत. काही गावातील कामांच्या दर्जाबाबत सरपंच, नागरिकांनी तक्रारी केल्या. खासदार बारणे या तक्रारींची दखल घेतली. निविदेतील अटी-शर्तीप्रमाणे कामे करावीत. कामाचा दर्जा राखावा. नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. तत्काळ निराकरण करावे. यापुढे कामांच्या दर्जाबाबत नागरिकांच्या तक्रारी येणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी. कार्ला फाटा ते एकविरा देवीपर्यंत जाणाऱ्या रस्त्याच्या कामाच्या दर्जाबाबत खासदार बारणे यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. याची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची ग्वाही त्यांनी दिली. रस्ते, पाणी, वीज, जातीचे दाखले याबाबत नागरिकांच्या तक्रारी येऊ देऊ नका, वेळेवर आणि दर्जेदार सुविधा पुरवाव्यात. तसेच सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत सुरू असलेल्या शाळांच्या कामाचाही आढावा त्यांनी घेतला. कंपन्याकडून सीएसआर निधी उपलब्ध करून दिला जाईल असेही खासदार बारणे म्हणाले.

### आता बायोमेट्रिक पध्दतीने हजेरी..

**» ग्रामीण भाग असल्याने अधिकारी कार्यालयात वेळेवर येताना दिसत नाहीत. विलंबाने येतात. त्यांना वेळेचे गांभीर्य नाही. अधिकारी जागेवर नसल्याने नागरिकांना ताटकळत थांबावे लागते. त्यामुळे मावळातील सर्व शासकीय कार्यालयात बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करावी. त्याबाबत सर्व कार्यालयात मशीन बसविण्याची सूचनाही खासदार बारणे यांनी केली.**

# भोसरीमध्ये ढोल-ताशा स्पर्धेचा दणदणाट!

## नवचैतन्य तरुण मंडळ 'आमदार चषक'चे मानकरी

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'आमदार चषक ढोल-ताशा' स्पर्धेत दापोडी येथील नवचैतन्य तरुण मंडळाने विजेतपद पटकावले. या स्पर्धेच्या निमित्ताने ढोल-ताशांचा दणदणाट पहायला मिळाला. महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशनतर्फे भोसरीत आमदार चषक ढोल झांज स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. बाळासाहेब पवळे, कालिदास लांडगे, संतोष लांडगे आणि अशोक शेडगे यांनी आयोजनासाठी पुढाकार घेतला. स्पर्धेत एकूण १७ पथक सहभागी झाले. या स्पर्धेत नवचैत्न्य तरुण मंडळ, दापोडी पथकाने आमदार चषकाचे मानकरी



व प्रथम क्रमांक पटकावला. भैरवनाथ तरुण मंडळ, बोरज मावळ यांनी द्वितीय क्रमांक, रासाई तरुण मंडळ, वडगाव, शिरुर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. तसेच, श्री भैरवनाथ तरुण मंडळ, काले मावळ चौथा, दत्त मंदिर, तरुण मंडळ, खडकी यांनी पाचवा, जय भवानी तरुण मंडळ, दिघी यांनी सहावा, सह्याद्री क्रीडा मंडळ, दिघी यांनी सातवा, कानिफनाथ तरुण मंडळ आढले, मावळ यांनी आठवा क्रमांक, भैरवनाथ तरुण मंडळ शिवणे, मावळ यांनी नववा आणि दहावा क्रमांक श्रीराम तरुण मंडळ, धनगव्हन मावळ यांनी पटकावला आहे. वैयक्तिक पारितोषिकमध्ये शिस्तबद्ध संघ दत्त मंदिर तरुण मंडळ, उत्कृष्ठ ढोलवादक विशाल दहिभाते, उत्कृष्ठ ताशावादक मनोज धारवाड, उत्कृष्ट घंटावादक राम जाधव, उत्कृष्ट झांज वादक जानव्ही वाळके यांना प्रदान करण्यात आले. बालकलाकार अर्णव परांडे यांना उत्कृष्ट ताशावादक पुरस्कार दिला. सूत्रसंचालन सतीश काकडे, गणेश लांडगे यांनी केले. पंच म्हणून अक्षय लांडगे, आशिष लांडगे, रोहिदास फुगे, रविंद्र यादगिरी यांनी काम पाहिले. तसेच, भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त दिघी येथे 'जॉब फेअर' चे आयोजन करण्यात आले. यामध्ये एकाच दिवसात तब्बल ८८९ युवकांना नोकरीची संधी मिळाली. भाजपाचे माजी नगरसेवक विकास डोळस आणि शहर चिटणीस कुलदीप परांडे यांच्या पुढाकाराने हा नोकरी मेळावा घेण्यात आला. त्याला परिसरातील युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. चिखली येथील रिव्हर रेसिडेन्सी येथे माजी महापौर राहुल जाधव यांच्या पुढाकाराने आकाश फल्ले प्रस्तूत 'खेळ रंगला पैठणीचा' कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रथम क्रमांक फ्रिज, द्वितीय गॅस शेगडी, मिस्कर टेबल फॅन यासह मानाची पैठणी आणि भेटवस्तू अशी बक्षीसे देण्यात आली. यावेळी उद्योजक निखिल बोऱ्हाडे, निलेश बोराटे, सामाजिक कार्यकर्त्या मंगल जाधव, सोनम जांभूळकर, ॲड. महेश लोहारे आदी उपस्थित होते.

# शाळेची माहिती अद्ययावत न केल्यास शिक्षकांचे वेतन रोखण्याची कारवाई!

## यू-डायस प्लस प्रणालीमध्ये माहिती अद्ययावत करावी

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** यू-डायस प्लस ऑनलाइन प्रणालीमध्ये शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती अद्ययावत करणाऱ्या शाळांमधील शिक्षकांचे वेतन थांबवण्यात यावे, असे आदेश समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक प्रदीपकुमार डांगे यांनी दिले आहेत. त्यामुळे राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित शाळांना येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत यू-डायस प्लस प्रणालीमध्ये माहिती अद्ययावत करावी लागणार आहे. राज्यातील सर्व शासकीय, अनुदानित शाळांमधील भौतिक सुविधा, शिक्षक संख्या, विद्यार्थी संख्या आदी माहितीच्या आधारे राज्य व केंद्र शासनाकडून २०२४-२५, २०२५-२६ या वर्षासाठी वार्षिक नियोजन, अंदाजपत्रक तयार केले जाणार आहे. त्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांनी आवश्यक माहिती अद्ययावत करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु, बहुतांश शाळांनी त्याकडे दुर्लक्ष केले. माहिती अद्ययावत न झाल्यामुळे शाळेतील विद्यार्थी शासनाकडून देण्यात येणाऱ्या मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक सोयी सुविधा, शिष्यवृत्ती आदी गोष्टींपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत सर्व माहिती अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यु-डायस प्लस प्रणालीमधील अहवालानुसार, ८८ टक्के शाळांनी भौतिक माहिती अद्यावत केलेले आहे. ७६ टक्के शाळांमधील शिक्षकांची माहिती अंतिम करण्यात आली असून, ७१ टक्के विद्यार्थ्यांची माहिती अंतिम झालेली आहे. मात्र, २५ हजार ७८८ शाळांनी शिक्षकांची माहिती भरण्याकरता अद्याप सुरुवातच केलेली नाही. तर १२ हजार ९४७ शाळा भौतिक माहिती भरण्यास चालढकल करत आहेत. त्यामुळे समग्र शिक्षा, स्टार्स व पीएम श्री योजनेचे वार्षिक नियोजन करण्यास विलंब होत आहे. शाळांकडून माहिती अद्यावत होत नसल्यामुळे संबंधित शाळांमधील शिक्षकांचे वेतन अदा करू नये.



जिल्हा व तालुका स्तरावरील वेतन पथकांनी शाळांकडून यु-डायस प्लस प्रणालीमध्ये शाळा, विद्यार्थी व शिक्षक यांची सर्व माहिती अद्यावत केल्याचे मुख्याध्यापकांकडून प्रमाणित करून घ्यावे. त्यानंतरच वेतन अदा करण्याबाबत परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. यू-डायस प्लस ऑनलाइन प्रणालीमध्ये शाळा, विद्यार्थी व शिक्षकांची माहिती अद्ययावत करणाऱ्या शाळांमधील शिक्षकांचे वेतन थांबवण्यात यावे, असे आदेश समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक प्रदीपकुमार डांगे यांनी दिले आहेत. त्यामुळे राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित शाळांना येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत यू-डायस प्लस प्रणालीमध्ये माहिती अद्ययावत करावी लागणार आहे. राज्यातील सर्व शासकीय, अनुदानित शाळांमधील भौतिक सुविधा, शिक्षक संख्या, विद्यार्थी संख्या आदी माहितीच्या आधारे राज्य व केंद्र शासनाकडून २०२४-२५, २०२५-२६ या वर्षासाठी वार्षिक नियोजन, अंदाजपत्रक तयार केले जाणार आहे. त्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांनी आवश्यक माहिती अद्ययावत करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु, बहुतांश शाळांनी त्याकडे दुर्लक्ष केले. माहिती अद्ययावत न झाल्यामुळे शाळेतील विद्यार्थी शासनाकडून देण्यात येणाऱ्या मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक सोयी सुविधा, शिष्यवृत्ती आदी गोष्टींपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत सर्व माहिती अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यु-डायस प्लस प्रणालीमधील अहवालानुसार, ८८ टक्के शाळांनी भौतिक माहिती अद्यावत केलेले आहे. ७६ टक्के शाळांमधील शिक्षकांची माहिती अंतिम करण्यात आली असून, ७१ टक्के विद्यार्थ्यांची माहिती अंतिम झालेली आहे.


### माहिती अद्ययावत करण्याचे आदेश

**» राज्यातील सर्व शासकीय, अनुदानित शाळांमधील भौतिक सुविधा, शिक्षक संख्या, विद्यार्थी संख्या आदी माहितीच्या आधारे राज्य व केंद्र शासनाकडून २०२४-२५, २०२५-२६ या वर्षासाठी वार्षिक नियोजन, अंदाजपत्रक तयार केले जाणार आहे. त्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत राज्यातील सर्व मान्यताप्राप्त शाळांनी आवश्यक माहिती अद्ययावत करण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु, बहुतांश शाळांनी त्याकडे दुर्लक्ष केले. माहिती अद्ययावत न झाल्यामुळे शाळेतील विद्यार्थी शासनाकडून देण्यात येणाऱ्या मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक सोयी सुविधा, शिष्यवृत्ती आदी गोष्टींपासून वंचित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

# दिवाळी सुट्टीतही विद्यार्थ्यांचा बालदिवस उत्साहात

## विविध 'ॲक्टिव्हीट'जद्वारे विद्यार्थ्यांची 'ऑनलाईन' धम्माल

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** बाल दिवसम्हणजे विद्यार्थ्यांच्या आनंदाचा आणि उत्साहाचा दिवस. मात्र, यावर्षी दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे अनेक शाळांमध्ये 'चिल्ड्रेन्स डे' साजरा झाला नाही. याला अपवाद ठरले ते म्हणजे भोसरीतील गायत्री इंग्लिश मिडियम स्कूल. विद्यार्थी आणि पालकांबाबत आपुलकी निर्माण केलेल्या गायत्री स्कूल प्रशासनाने यावर्षी 'ऑनलाईन' बाल दिवस' साजरा केला. स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या (एसव्हीएसपीएम) भोसरी येथील ग्रायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये प्रतिवर्षी बाल दिन (दि.१४ नोव्हेंबर) मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. यावर्षी दिवाळीच्या सुट्टी सुरू होत्या. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्कूलमध्ये धम्माल करता येणार नाही. त्यामुळे स्कूल प्रशासनाने 'ऑनलाईन बाल दिवस' साजरा करण्याचा नवा फंडा नियोजित केला. त्याला विद्यार्थ्यांसह





पालकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. 'दिवाळी मेला' च्या निमित्ताने स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी पणती बनवल्या होत्या. या उपक्रमातून प्रोत्साहन घेवून त्यांनी स्वत: पणत्या आणल्या आणि सुशोभित करुन आपल्या नातेवाईकांना भेट दिल्या आहेत. तसेच, विविध 'अ‍ॅक्टिव्हीटी' सादर करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात आले. त्यामुळे यावर्षीचा बालदिवसही संस्मरणीय झाला. यांसाठी उपमुख्याध्यापिका प्रिया नेवाळे व श्रुती जोशी यांनी यांनी पुढाकार घेतला. पूर्व प्राथमिक विभागाच्या वृशाली आहिरे व त्यांच्या टीमने अतिशय सुंदर मुखवटे करुन मुलांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न केला. शाळेतील सर्व विभागाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी याकामी पुढाकार घेतला. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष विनायक भोंगाळे, व्यवस्थापकीय संचालक कविता भोंगाळे, विश्वस्त सरिता विखे-पाटील यांनी या उपक्रमाचे कौतूक केले.

# टिपू सुलतानचे उदात्तीकरण सहन केले जाणार नाही!

## टिपू सुलतान विरोधात पुण्यातील भाजप कार्यकर्ते आक्रमक

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** टिपू सुलतान विरोधात पुण्यातील भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. टिपू सुलतानचे उदात्तीकरण सहन केले जाणार नाही, असं म्हणत टिपू सुलतानच्या जयंतीला विरोध केला आहे. पुणे पोलीस आयुक्त रितेश कुमार यांची भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन तातडीने अशी धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांना शिक्षा करण्याची मागणी केली. पोलिसांनी वेळीच असल्या प्रवृत्तीला आळा घालावा अन्यथा या प्रवृत्तीचा बिमोड करण्यास आम्ही समर्थ आहोत, असा भाजप



पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी इशारा दिला. ज्याने असंख्य हिंदूंची कत्तल केली ज्याने अनेक लोकांचे बळजबरी धर्मांतर करून त्यांचा अमानुष छळ केला अशा धर्मांध विकृती असलेल्या टिपू सुलतान ची जयंती महाराष्ट्रात साजरी केली जात असेल तर आम्ही गप्प बसणार नाही त्याचे उदात्तीकरण होऊ देणार नाही पोलिसांनी वेळीच असल्या प्रवृत्तीला आळा घालावा अन्यथा या प्रवृत्तीचा बिमोड करण्यास आम्ही समर्थ आहोत असा इशारा भारतीय जनता पार्टी चे शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी दिला. पुणे पोलीस आयुक्त रितेश कुमार यांची भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळाने भेट घेऊन तातडीने अशी धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांना शासन करण्याची मागणी केली.नुकतीच पुण्यात टिपू सुलतानची जयंती साजरी करण्यात आली. पुढे बोलताना घाटे यांनी पोलिसांनी या बाबत गंभीरतेने दखल घेऊन या लोकांचा शोध घेऊन कारवाई करून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी अशी मागणी केली. या शिष्टमंडळामध्ये घाटे यांच्यासह सरचिटणीस पुनीत जोशी, राघवेंद्र मानकर ,राजेंद्र शिळीमकर ,राहुल भंडारे ,वर्षा तापकीर, महेश पुंडे यांचा समावेश होता. पुण्यातील कायदा आणि सुव्यवस्था बिघडविण्यासाठी काही जणांकडून जाणीवपूर्वक अशी कृत्ये केली जात असल्याचे दिसते. केवळ धर्म वेगळा होता म्हणून ज्याने येथील नागरिकांवर अत्याचार केले. त्याच्या उदात्तीकरणाचा प्रकार पुणे शहर भारतीय जनता पार्टी कधीच खपवून घेणार नाही. आपण या संपूर्ण प्रकाराचा तपास करावा आणि यामागे नक्की कोण लोक आहेत, याचा शोध घ्यावा, अशी विनंती या पत्राच्या माध्यमातून आम्ही करतो आहोत. पुण्यातील शांतता बिघडेल, अशा गोष्टींना अजिबात थारा दिला जाऊ नये. पोलिसांनी यामध्ये वेळीच हस्तक्षेप करावा, अशी आमची मागणी आहे. आपण या प्रकरणात लक्ष घालून संबंधित कनिष्ठ अधिकाऱ्यांना आवश्यक आदेश द्यावेत, अशी विनंती आम्ही करतो, असं त्यांनी पोलिसांना दिलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

# धीरेंद्र शास्त्री यांच्याविरोधात अंनिस आक्रमक

## धीरेंद्र शास्त्री यांच्यावर गुन्हा दाखल करा : अंनिस

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांच्यावर गुन्हा दाखल करा, अशी मागणी अंनिसतर्फे करण्यात आली. त्यासंदर्भात त्यांनी पोलिसांना निवेदनदेखील दिलं आहे. बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांचा पुण्यातील संगमवाडी परिसरातील तीन दिवसीय सत्संग आणि दरबार आयोजित केला होता. भाजपचे माजी आमदार जगदीश मुळीक यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. अशास्त्रीय, अवैज्ञानिक, घटनाबाह्य, दिशाभूल, फसवणूक करणारे आणि अंधश्रद्धेला खतपाणी घालणारे वक्तव्य, भाष्य, कृत्य धिरेंद्र शास्त्री सतत करत असून त्याची पुनरावृत्ती पुण्यात देखील झाली आहे, असा आरोप महाराष्ट्र अंनिसने केला आहे. महाराष्ट्र अंनिसने मागण्यांचे निवेदन पोलीस प्रशासनाला दिले आहे. वर्दीवर असणारे पोलीस अधिकारी हे धिरेंद्र शास्त्री यांच्या दरबारात जाऊन शास्त्रीपुढे नतमस्तक झाले. त्यांनी अशास्त्रीय पद्धतीने समस्यांची उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न केला असून त्यांचे दरबारात जाणे हे महाराष्ट्र सेवा अधिनियम व तत्सम कायद्यांचा भंग करणारे आहे. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करावी अशी देखील मागणी त्यांनी केली आहे. धीरेंद्र शास्त्री हे लोकांच्या देव, धर्म, श्रद्धा, उपासना आणि भावना, अगतिकता, अज्ञान यांचा गैरफायदा घेऊन लोकांना देव धर्म श्रद्धा उपासनेशी निगडित विसंगत, अशास्त्रीय, अवैज्ञानिक बाबी सांगत आहेत, त्यांच्यावर कारवाई करा, अशी अंनिसची मागणी आहे. अपरिचित व्यक्तीच्या भूतकाळात घडलेल्या गोष्टी अचूकपणे कागदावर लिहून दाखवतो. लोकांच्या मनात काय सुरू आहे ते ओळखतो. असाध्य आजार बरे करतो. भूत प्रेते पळवून लावतो. लिंबूद्वारे समाधान प्राप्त करून देतो, आदी दावे बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री यांनी त्यांच्या कार्यक्रमातून केले आहेत. तसेच संतांसंबंधी चुकीची बदनामीकारक वक्तव्य केली आहेत. भारतीय राज्यघटनेने व्यक्तीला देव धर्म श्रद्धा उपासना स्वातंत्र्य दिले. त्याचा महा. अंनिस संघटना आदर करते. मात्र व्यक्तीची देव धर्म श्रद्धा उपासनेच्या आधारे फसवणूक, दिशाभूल, शोषण होत असेल, त्यातून सार्वजनिक आरोग्य, नीतिमत्ता, कायदा सुव्यवस्थेला अडथळा येत असेल तर त्याविरोधी संघटना भूमिका, प्रबोधन, प्रतिकार, कृतिकार्यक्रम करत आली आहे. अंनिसचे हे वर्तन घटनेशी सुसंगत असून मानवी जीवन समृद्ध करण्यासाठीचे आहे. धीरेंद्र शास्त्री हे लोकांच्या देव, धर्म, श्रद्धा, उपासना आणि भावना, अगतिकता, अज्ञान यांचा गैरफायदा घेऊन लोकांना देव धर्म श्रद्धा उपासनेशी निगडित विसंगत, अशास्त्रीय, अवैज्ञानिक बाबी सांगत आहेत.